उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया यांचे कार्यालय

वन विभाग

Office of the Dy Conservator of Forest and Field Director Nawegaon Nagzira Tiger Reserve, Gondia

NNTR NAWEGAON - NAGZIRA TIGER RESERVE

कार्यालय:- "वनभवन"टिबी टोली, कुडवा रोड, गोंदिया (महाराष्ट्र) पीन कोड नं.441614 फोन नं.07182-250122, ई मेल: cfwlgondia@mahaforest.gov.in

कक्ष-लले/पर्यटन/ फा. क्र.19/2024-25/ 2245 गोंदिया दिनांक - 06-01-2025

**विषय** :- नवेगाव-नागझिरा व्याघ राखीव क्षेत्रातील पर्यटनामध्ये भ्रमणध्वनी (Mobile) न बाळगण्याबाबत.

**संदर्भ**:- दिनांक 06 जानेवारी, 2025 रोजी मा. अपर मुख्य सचिव (वने) म. रा. नागपूर यांचे अध्यक्षतेखाली झालेली VC.

उपरोक्त संदर्भाअन्वये राज्यातील वन पर्यटनाबाबत आढावा सभा घेण्यात आली. सदरहू सभेत राज्यातील पर्यटनात एकसुत्रात आणण्याकरीता विस्तृत चर्चा होवून मा. मुख्य वन्यजीव रक्षक तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वन पर्यटनामध्ये पर्यटक (Tourist) जिप्सी चालक (Gypsy Driver), निसर्ग मार्गदर्शक ( Eco-Guide) यांना भ्रमणध्वनी (Mobile) न बाळगण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने आपणास सुचित करण्यात येते कि, दिनांक 07.01.2025 पासून नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील सर्व पर्यटन प्रवेशव्दारावरील पर्यटक (Tourist), जिप्सी चालक (Gypsy Driver), निसर्ग मार्गदर्शक ( Eco-Guide) यांना **पर्यटन करते वेळी भ्रमणध्वनी (Mobile) बंदी घालण्यात येत आहे**. मात्र नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात कॅमेरा (स्थिर कॅमेरा व चल कॅमेरा) सुरू राहील. तसेच खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

1. नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात पर्यटन करतेवेळी पर्यटक, जिप्सी चालक, निसर्ग मार्गदर्शक यांनी त्यांचे भ्रमणध्वनी पर्यटन प्रवेशव्दारावर जमा करावे किंवा त्यांचे सोईनुसार व्याघ्र प्रकल्पाचे बाहेर ठेवावे.
2. पर्यटन प्रवेशव्दारावरून पर्यटनाला जात असतांना व्याघ्र प्रकल्पात भ्रमणध्वनी जाणार नाही याची प्रवेशव्दारावर कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यानी खातर जमा करावी.
3. पर्यटनाला जात असतांना निसर्ग मार्गदर्शकांनी ( Eco-Guide) व्याघ्र प्रकल्पात सफारी करतांना काय करावे व काय करू नये याबाबत पर्यटकांना अवगत करावे. या करीता आपल्या सर्व पर्यटन प्रवेशव्दारावरील जिप्सी चालक (Gypsy Driver), निसर्ग मार्गदर्शक ( Eco-Guide) यांची सभा तात्काळ घेवून व्याघ्र् प्रकल्पाला सहकार्य करण्याबाबत संबधीताना कळविण्यात यावे.

उपरोक्त सुचनाचे काटेकोरपणे पालन होईल यांची दक्षता घ्यावी..

(जयरामेगौडा आर.)
उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,
नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया.

**प्रति,**

उपसंचालक,
नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोली

**प्रतिलिपी** :- 1. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म. रा. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

2. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
3. सहाय्यक वनसंरक्षक (सर्व) यांन माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत.
4. वरीष्ठ तकनिकी निदेशक, एनआयसी, वनभवन, नागपूर यांना माहितीस अग्रेषीत. त्यांनी नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात भ्रमंनध्वनी (Mobile) बंदी बाबत ऑनलाईनवर दर्शविण्यात यावी.
2. वनपरीक्षेत्र अधिकारी (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस रवाना. त्यांनी त्यांचेकडील संबधीत प्रवेशव्दारावर या बाबतचा सुचना फलक लावून पर्यटक (Tourist) जिप्सी चालक (Gypsy Driver), निसर्ग मार्गदर्शक ( Eco-Guide) यांचे भ्रमणध्वनी (Mobile) ठेवण्याबाबत तत्सम व्यवस्था करावी